INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | NOVEMBER - 2022

# नागपूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात येणाऱ्या समस्या: एक अध्ययन

प्रा. कल्पना कांतीलाल पटेल[१] , डॉ. राधेशाम पिलाजी चौधरी[२]
[१]संशोधनकर्ती
[२]मार्गदर्शक, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ.

## सारांश



नागपूर हा जिल्हा उत्तर अक्षांश २०.३५ ते २१.४४ व पूर्व रेखांश ७८.४० ते ७९.४० चे दरम्यान पसरलेला आहे. जिल्हयांचे मुख्यालय नागपुर येथे असून ते भारताचे मध्यवर्ती ठिकाण आहे.जिल्ह्यात शैक्षणिकदृष्टया विकास होत असला तरी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत नागपूर जिल्हा शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेलाच आहे. या परिस्थितीचा विचार केला तर नागपूर जिल्हा अतिमागास आहे असे दिसून येते. जिल्ह्यातील महिलांमध्ये प्रचंड निरक्षरता, दारिद्रय, बेकारी व समाजात हिन दर्जा आहे. ह्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी जिल्ह्यात स्वयंसहाय्य महिला बचत गट चळवळ सुरू झाली आहे. नागपूर जिल्ह्यातील महिलांच्या जीवनमानात बचत गटांमुळे काही बदल झालेले आहेत काय, त्यांचे दारिद्रय कमी झाले आहेत काय, राजकारणात त्यांचा सहभाग वाढला काय, त्यांच्या सामाजिक स्थितीत काही बदल झालेत काय, त्यांच्यात जाणीव जागृती झाली आहे काय व त्यांना स्वत:चे व्यवसाय सुरू करुन आत्मनिर्भर बनता आले काय, या प्रश्नांची उत्तरे शोधणे महत्वाचे आहे. तसेच बचत गट चालवतांना त्यांच्या कुटुंबातून, समाजातून त्यांना काही अडथळे आणले जातात काय, स्वयंसहाय्य महिला बचत गट चालवतांना कोणत्या समस्या येतात, त्या समस्यांवर त्यांनी कशी मात केली तसेच त्यावर काही उपाय सुचवता येतात काय? व एकंदरीत या सर्व बाबींची जिल्ह्याच्या आर्थिक विकासात काही भूमिका आहे काय? या सर्व प्रश्नांचा अभ्यास करणे महत्वाचे वाटले म्हणून संशोधनासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून भारतात स्त्रियांना खुप आदराचे स्थान होते. भारतीय स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य होते. सर्वच धर्मांनी महिलांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. परंतु कालांतराने लिखाणाचा चुकीचा अर्थ किंवा त्यात घालघुसड यामुळे महिलांवर अनेक बंधने टाकण्यात आली. खरे तर स्त्रीशिवाय पुरुषांचे जीवन अधुरे असते. पुरुष हा एका दृष्टीने रानटी, भटका व शिकारी आहे. त्याला माणसाळण्याचे, माया व ममता शिकविण्याचे, त्याला कुटुंबवत्सल बनवण्याचे कार्य स्त्रीने केले आहे. आपली प्रगती करायची असेल किंवा मोक्षप्राप्ती करुन घेण्यासाठी 'लक्ष्मीची' आराधना करावी लागते. ज्ञानप्राप्तीसाठी 'सरस्वतीची' आराधना तर दुर्जनाचा नाश करण्यासाठी 'दुर्गा' पुजा करावी लागते. यावरुन एकच दिसते की, मानवाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्त्रीचीच आराधना करावी लागते व तिलाच मानाचे

स्थान होते. वैदिक काळात 'मनुने' मनुस्मृतीत पुरुषप्रधान संस्कृतीचे बिजारोपण केले आहे व स्त्रियांना दुय्यम स्थान दिले आहे.

भारतात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन 'चूल आणि मूल' एवढ्यापुरताच मर्यादीत होता. स्त्रियांवर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार होत होते. महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक या सर्वच बाबतीत दुय्यम स्वरूपाची वागणूक दिली जात होती. स्त्री म्हणजे बाळाला जन्म देणारे यंत्र, स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तू अशीच समजूत होती. मुलींचे विवाह अत्यंत कमी वयात होत असत. पतीचा मृत्यु झाला तर संपूर्ण जीवन तिला विधवा म्हणून जगावे लागत होते किंवा सती जावे लागत होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांना हक्काची जाणीव होत नव्हती, कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत तिला गौण स्थान होते, तिच्या आरोग्याची काळजी घेतल्या जात नव्हती. स्त्री बालमृत्युचे प्रमाण मोठे होते. मातामृत्युचे प्रमाणही मोठे होते. पुढील काही आकडेवारीवरून महिलांची स्थिती काय आहे हे कळून येते.

**सारणी क्रमांक १: स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात येणाऱ्या समस्यांचा प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| कुटुंबाच्या सहकार्याचा अभाव | २९२ | ४१.७ |
| शासनाच्या योजनांबद्दल जागरूकता नसणे | ५३४ | ७६.३ |
| बँकची लांब कागजी कार्यवाही | २९२ | ४१.७ |
| अधिकाऱ्यांच्या सहयोगाचा अभाव | १९० | २७.१ |
| राजकीय हस्तक्षेप | १८२ | २६.० |
| इतर | २४ | ३.४ |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये नागपूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४१.७ टक्के स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात कुटुंबाचा सहकार्य प्राप्त होत नसून स्वयंसहाय्य बचत गटासंबंधी शासनाच्या योजनांबद्दल जागरूकतेचा अभाव दर्शविणाऱ्या स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांची टक्केवारी ७६.३ टक्के होती. तसेच अनुक्रमे ४१.७ टक्के, २७.१ टक्के, २६.० टक्के व ३.४ टक्के स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात बँकची लांब कागजी कार्यवाही, अधिकाऱ्यांच्या सहयोगाचा अभाव, राजकीय हस्तक्षेप व इतर समस्यांचा सामना करावा लागतो. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात शासनाच्या योजनांबद्दल जागरूकतेचा अभाव सहन करणाऱ्या स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तुलनेत महत्वपूर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविले जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २७४ | ३९.१४ |
| नाही | ४०४ | ५७.७१ |
| सांगता येत नाही | २२ | ३.१४ |
| **एकूण** | ७०० | १००.० |
| Chi-Square | Df | Sig |
| 758.260 | 2 | <0.05 |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये नागपूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३९.१४ टक्के स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागतो. तसेच ५७.७१ टक्के स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागतो व वरील विधानासंबंधी सांगता येत नाही ही प्रतिक्रिया देणाऱ्या स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांची टक्केवारी ३.१४ होती. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत असण्यानुसार नागपूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ७५८.२६०; $P<0.05$) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत नसणाऱ्या स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तुलनेत महत्वपूर्णपणेअधिक आहे.

**सारणी क्रमांक ३: स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात येणाऱ्या समस्या | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| सभासदांचे दुर्लक्ष | ८० | ११.४ |
| व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव | २०२ | २८.९ |
| सभासदांमध्ये समन्वयाचा अभाव | ११६ | १६.६ |
| विपणन पद्धतीसंबंधी जागरूकतेचा अभाव | १५० | २१.४ |
| आर्थिक स्वरुपात सक्षम सभासदांद्वारे इतर सभासदांवर दबाव टाकण्याचा | २० | २.९ |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये नागपूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ११.४ टक्के स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात सभासदांचा दुर्लक्ष सहन करावा लागत असून २८.९ टक्के स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव सहन करावा लागतो. तसेच अनुक्रमे १६.६ टक्के, २१.४ टक्के व २.९ टक्के स्वयंसहाय्य बचत गट सदस्यांना स्वयंसहाय्य बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात सभासदांमध्ये समन्वयाचा अभाव, विपणन पद्धतीसंबंधी जागरूकतेचा अभाव व आर्थिक स्वरुपात सक्षम सभासदांद्वारे इतर सभासदांवर दबाव टाकण्याचा त्रास सहन करावा लागतो.

## निष्कर्ष

स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात कुटुंबाचे सहकार्य प्राप्त होत नसून स्वयंसहाय्य बचत गटासंबंधी शासनाच्या योजनांबद्दल जागरूकतेचा अभाव जाणवतो. तसेच स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यात बँकेची लांब कागदी कार्यवाही, अधिकाऱ्यांच्या सहयोगाचा अभाव, राजकीय हस्तक्षेप व इतर समस्या देखील जाणवतात. नागपूर जिल्ह्यातील गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागतो, ज्यात सभासदांचे व्यवसायाकडे दुर्लक्ष, सदस्यांना व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव, सभासदांमध्ये समन्वयाचा अभाव, विपणन पद्धतीसंबंधी जागरूकतेचा अभाव व आर्थिक स्वरुपात सक्षम सभासदांद्वारे इतर सभासदांवर दबाव टाकण्याचा प्रयास या प्रमुख समस्या आहेत.

## संदर्भ


१) महिला व बालकल्याण शासन निर्णय, यशदा प्रकाशन पुणे.
२) मुलाणी एम.यु., (२००८), अल्पबचत नियोजन (बचत गट), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ. ११.
३) मुलानी, एम.यु. (२००६).'महिला स्वयंसहाय्यता बचतगट' डायमंड पब्लीकेशन पुणे -३० पेज. ५८-५९
४) चौधरी, राजेश 'महिला बचत गट हस्तपुस्तीका' चौधरी लॉ पब्लीशर्स जळगांव, पुणे. पेज ९१ ते ९३.
५) गोटे, शुभांगी (२००४). 'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या' वरद पब्लीकेशन औरंगाबाद पेज नं. ६५ -८५.
६) ओमास., सं. शि., (२००६). 'महिला स्वयंसहाय्यता बचतगट' सैध्दांतीक पार्श्वभूमी व सद्यस्थिती अर्थवेध.
७) कदम., प्र. भा., (२००६). "स्त्री सक्षमीकरणात महिला बचत गटांचे योगदान", अर्थवेध.
८) करंदीकर., पराग. (२००७). 'किमयागार, लोकराज्य. पृ. क्र. ११-१२.
९) कऱ्हाडे, बी. एम. शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर, नागपूर, २०११
१०) गोटे, शुभांगी (२००४). 'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या' वरद पब्लीकेशन औरंगाबाद पेज नं. ६५ -८५.
११) गोटे., शुभांगी. (२००४). 'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या' वरद पब्लिकेशन्स औरंगाबाद. पृ. क्र. १००.
१२) चौधरी, राजेश 'महिला बचत गट हस्तपुस्तीका' चौधरी लॉ पब्लीशर्स जळगांव, पुणे. पेज ९१ ते ९३.
१३) धेंडे, लता (२००६). 'वित्त यंत्रणा एक विचार' पृ. क्र. १५८.
१४) पाटील, जे. एफ., पठाण, के. जी., ताम्हणकर, पी. जे. व यादव, एस. बी., (२०१२) अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,